SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा
# आणि
# साहित्या पुढील आव्हाने व उपाय

संपादक
**प्रा.यु.पी. सुपारे**
**मराठी विभाग प्रमुख,**
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव
ता.सेनगांव जि.हिंगोली

T.C.
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

सहसंपादक
**प्रा.डॉ.ए.डी.टापरे**
**मराठी विभाग,**
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव
ता.सेनगांव जि.हिंगोली

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्या पुढील आव्हाने व उपाय

संपादक

**प्रा.यु.पी. सुपारे**

**मराठी विभाग प्रमुख**

*** प्रकाशक ***

प्र.प्राचार्य प्रा.एस.जी. तळणीकर

तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव

जि.हिंगोली

फोन : (०२४५६) २०२४६५, २५०४६२

www.toshniwalacs.com | E-mail : prin.taccs212@rediffmail.com

प्रथम आवत्ती : ०४ जानेवारी २०२०

ISBN : 978-1-79482-974-9

*** मुद्रक ***

महेश ऑफसेट, परभणी

मूल्य : २५०/-

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.)

या पुस्तकातील सर्व शोधनिबंध लेखकाची मौखिल परवानगी ग्राह्य धरूनच हे शोधनिबंध एकत्रित करण्यात आले असून, त्या मतांशी संपादक व प्रकाशनक सहमत असतीलच असे नाही.

या पुस्तकाचे सर्व अधिकार प्रकाशनाधीन असून या पुस्तकातील कोणताही मजकूर, तक्ता किंवा तत्सम संकल्पना यांची कोणत्याही प्रकारे नक्कल करणे किंवा यांत्रिकी साधनांनी फोटो कॉपी, रेकॉडींग करणे कायद्याने गुन्हा असून असे आढळून आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल.

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | लेखकाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिकीकरण : भाषा, साहित्य आणि संस्कृती | प्रा.डॉ.मा. मा. जाधव | 9 |
| 2 | जागतिकीकरण आणि मराठी कविता : एक आकलन | प्रा. डॉ. बी. बी. खंदारे | 12 |
| 3 | जागतिकीकरणात मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाय | प्रा. डॉ. जयद्रथ जाधव, | 15 |
| 4 | मराठवाडी बोली अभ्यासाच्या दिशा | डॉ. विठ्ठल जंबाले | 21 |
| 5 | बदलत्या काळातील बोलीभाषा : आव्हाणे व उपाय | डॉ. वैजनाथ अनमुलवाड, | 23 |
| 6 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ.रेखा जगनाळे, | 27 |
| 7 | जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय | अस्मिता विश्वनाथ वांद्रे. | 34 |
| 8 | जागतिकीकरणाच्या युगात मराठी माध्यमातील मुलांना इंग्रजी बोलताना येत असलेल्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास | डॉ. शामसुंदर गुळभिले | 41 |
| 9 | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य | डॉ. सपना वाल्मीक सोनवणे | 50 |
| 10 | जागतिकीकरणाच्या वावटळीतील बलुतेदाराची व्यथा | | |
| 11 | मांडणारा कवी : अरुण काळे | प्रा.डॉ. यशपाल भिंगे | 53 |
| 12 | **जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव** | **प्रा. डॉ. डिगोळे विठ्ठलराव** | 53 |
| 13 | जागतिकीकरण आणि नव्वदीनंतरची मराठी कविता।। | डॉ. केशव पाटील | 59 |
| 14 | जागतिकीकरणानंतरच्या शैक्षणिक पडझडीची कविता : पोरगं शेकत बसलंय | प्रा.डॉ.संजय कसाब, | 65 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ. नवीन के. गिलबिले | 69 |
| 17 | जागतिकीकरण : मराठी भाषेची स्थिती, आव्हाने व उपाय | डॉ.रामकिशन नारायण दहिफळे | 72 |
| 18 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ. चंद्रकांत शेरखाने | 75 |
| 19 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.सुरेश शिंदे | 79 |
| 20 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ. राजेश धनजकर | 82 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा. डॉ. मुंढे संगीता | 85 |
| 22 | मराठी भाषेची सद्यःस्थिती आव्हाने आणि उपाय | प्रा.डॉ. शेषराव नाईकवाडे | 88 |
| 23 | जगतिकीकरण आणि आदिवासी लोकसाहित्य | प्रा. डॉ. पंडित शिंदे | 90 |
| 24 | 'तुडवण ' आणि शोषणाचे जागतिकीकरण | प्रा.डॉ. राम रौनेकर, | 94 |
| 25 | जागतिकीकरण आणि कादंबरी | प्रा.डॉ. पंडित रानमाळ, | 96 |
| 26 | जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ.प्रभाकर ना. कऱ्हाळे | 98 |
| 27 | जागतिकीकरणाच्या पाश्वभूमीवर बदलती महानगरीय मराठी कविता | प्रा.डॉ. जगताप यु. एस. | 101 |
| 28 | जागतिकिकरणाचे संदर्भ अचुकपणे टिपणारी कविता महाजन यांचा 'ग्राफिटी वॉल': एक आकलन | प्रा. डॉ. शारदा कदम . डॉ. कविता लोहाळे | 104 |
| 29 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ.गजानन आनंता देवकर , | 107 |
| 30 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा. डॉ. गणपती मोरे | 111 |
| 31 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ.एल.डी.गलंडे | 113 |
| 32 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.कालीदास गुडदे | 116 |
| 33 | जागतिकीकरणआणिमराठीसाहित्य | प्रा. इंगळे के.एस. | 118 |
| 34 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ.शंकर विभुते | 123 |
| 35 | जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावरील कृषी जाणीवा | प्रा. डॉ. दुष्यंत कटारे | 125 |
| 36 | 2000 नंतरची मराठी ग्रामिण कादंबरी : एक अभ्यास | प्रा.कृष्णा काशिराम कोटकर | 128 |
| 37 | जागतिकीकरण आणि दलित कविता : एक अभ्यास | प्रा. मारोती गायकवाड | 132 |
| 38 | मराठी भाषेची सद्यःस्थिती, आव्हाने व उपाय नेहा | रतन बनसोडे | 137 |

# जागतिकीकरण आणि मराठी भाषा

**प्रा. डॉ. मुंढे संगीता नारायणराव**
मराठी विभाग,
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

SHIVAJI COLLEGE HINGOLI

जागतिकीकरणाचा अर्थ आहे खुली अर्थव्यवस्था. जागतिकीकरणाचा स्वीकार करून भारताला आता दोन दशके पूर्ण होतील.जागतिकीकरणाचे बरे वाईट परिणाम आता सर्वत्र दिसू लागले आहेत. जागतिकीकरणाचा मुळ हेतू हा खुली अर्थव्यवस्था आणि त्यातून भांडवलशाहीचे हीत पाहणारी व्यवस्था निर्माण करणे हा आहे. उदारीकरण, खाजगीकरण या जागतिकीकरणाच्याच एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. विकसीत देशांनी विकसनशिल देशाच्या अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाच्या माध्यमातून आपली पकड घट्ट केली आहे. नफेखोरी हा या भांडवलशाही व्यवस्थेचा मुळ हेतू आहे. कोणत्याही मार्गाने नफा मिळवणे हे उद्दिष्ट आहे. नैतिक मूल्य पायदळी तुडविली जातात. आपल्या मालाला ग्राहक निर्माण करणे हा त्यांचा मुळ हेतू असतो. त्यासाठी मोठया प्रमाणावर जाहिरात केली जाते. माध्यमांच्या साहाय्याने जाहिरातीच्या माध्यमातून ग्राहकांना आपल्या कहयात घेणे हा एकमेव उद्देश असतो. त्याच्या परिणामाशी त्यांना काहीही देणे घेणे नसते. त्यामुळे एकूनच मानवी जीवनात चंगळवाद, भोगवाद वाढला आहे. माणसाचे वस्तूत आणि ग्राहकात रूपांतर होत आहे. जाहिरातीच्या अभासमय दुनियेत लोकांना ओढून घेतल्या जात आहे. पण प्रत्यक्षात आजूबातूला असलेली जीवघेनी स्पर्धा, गरिबी, बेकारी, आर्थिक विषमता, पर्यावरणाचा असमतोल हे घातक परिणाम भोगावे लागत आहेत. त्यातून नैराश्य, व्यसनाधिनता, मानसिक विकार वाढत आहेत. जागतिकीकरण ही संकल्पना आर्थिक हेतूने स्वीकारली होती ती तेवढयापुरती मर्यादित न राहता त्याचे सामाजिक सांस्कृतिक, पर्यावरणदृष्टयाही परिणाम सहन करावे लागत आहेत. डॉ. विलास खोले म्हणतात, "जागतिकीकरणाच्या चर्चेला मुख्य संदर्भ जरी अर्थशास्त्रीय असला तरी,जागतिकीकरणाचे परिणाम मात्र त्या क्षेत्रापुरते मर्यादित नाहीत ते राजकीय व सांस्कषतिक क्षेत्रावरही होतात आणि कळत नकळत त्याचा परिणाम वाङ्मयविश्वावरही पडल्या वाचून राहत नाही."[1]

जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत उद्योग, शेती, रोजगार, परराष्ट्र संबंध, संस्कृती धर्म, विचारप्रणाली आणि जीवनपद्धती या सगळयामध्ये अमुलाग्र बदल होत आहेत. दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञानामध्ये अमुलाग्र बदल घडून आले आहेत. सर्व जग जवळ आले आहे. खेडयाचेही रूप पालटले आहे. प्रगत तंत्रज्ञान खेडोपाडयात जावून पोहोचल्यामुळे तिथल्या जीवनपद्धतीवर, शेतीवर याचे दुरगामी परिणाम झाले आहेत. विविध देशातील उद्योगधंदे भारतात आल्यामुळे त्याबरोबर तिथली संस्कृतीही आली आहे. आंतरराष्ट्रीय विचार आदान प्रदानाची भाषा म्हणून इंग्रजीचे महत्त्व वाढले आहे. सध्याच्या काळात इंग्रजी ही भाषा अनिवार्य समजल्या जात आहे. त्यामुळे स्थानिक भाषांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

भाषा ही केवळ विचार व्यक्त करण्याचे किंवा व्यवहार पार पाडण्याचे साधन नाही तर भाषा ही एक त्या त्या समाजाची सांस्कषतिक परंपरा प्रवाहीत करणारी एक विचार प्रणाली असते. अनेक पिढयांचे ज्ञान भाषेमध्ये सामावलेले असते. एखादी भाषा नष्ट होणे म्हणजे हजारो वर्ष जुन्या परंपरा, ज्ञान, संस्कष्ती नष्ट होत असते. आज भारतात कितीतरी भाषा जागतिकीकरणाच्या रेटयात नष्ट होत आहेत. ही मानवी संस्कृती व जीवनाच्या दष्टीने धोक्याची घंटा आहे. डॉ. प्रमोद मुनघाटे यांच्या मते "जगाच्या पाठीवरील लहान लहान भाषांचा मृत्यू हा सजीवांच्या नष्ट होण्याप्रमाणेच मानवी संस्कृतीला आणि सृष्टीच्या पर्यावरणाला हानीकारक आहे. भारतात तर दिड हाजारावर बोली बोलल्या जातात. ही भाषिक विविधता आपल्या संस्कृतीचे एक वैशिष्टये आहे. ती विविधता जपणे आवश्यक आहे."[2] भारतीय समाजामध्ये तर मोठया प्रमाणावर विविधता आह. प्रत्येक राज्यांची स्वतःची एक सांस्कषतिक परंपरा आहे. पण जागतिकीकरणाच्या या रेटयात ही विविधताच नष्ट होण्याच्या मांर्गावर आहे. सगळे सपाटीकरण सुरू आहे. वैविध्यामधील सौदर्य, मानवी विचार, संस्कार, मूल्य हे सर्व नष्ट होत आहेत. सगळीकडे बाजारू प्रवृत्ती वाढते आहे. जाहिरातीच्या वाढत्या प्रमाणामुळे फक्त दिखाव्याला महत्व येत चालले आहे. वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. मानवी मूल्याचे अंधःपतन होत आहे. त्यातूनच गुन्हेगारी वृत्ती, असंवेदनशिलता, भ्रष्टाचार, असंहिष्णूता, समाजविघातक

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq & Dist.Hingoli.(MS.)

जागतिकीकरणाचा भाषेवरील आणखी एक परिणाम म्हणजे ... प्रवृत्ती वाढताना दिसत आहे. हे कुठेतरी थांबले पाहिजे. छोटे छोटे जे उद्योग, व्यवसाय स्थानिक पातळीवर होते ते नष्ट झाल्यामुळे त्यांच्या व्यवसायाशी संबंधीत हजारो ... व्यवहारातून बाद झाले आहेत. त्यामुळे भाषेचे तर नुकसान झालेच आहे पण कृषी संस्कृतीही धोक्यात आली ... स्थानिक रोजगार बुडाल्यामुळे शहरीकरण वाढते आहे व त्यातूनच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सध्याचे युग हे इंटरनेटचे, संगणकाचे आहे. संपूर्ण जग प्रसारमाध्यमामुळे जवळ आले आहे. जगभरात ... एखादी घटना घडली की क्षणभरात आपल्याला समजते. माणूस एकीकडे या विश्वाचा एक हिस्सा झाला आहे ... दुसरीकडे मोबाईल, इंटरनेटच्या वापरामुळे आपल्याच माणसापासून दुरावत चालला आहे. माणसामाणसातील ... कमी झाला आहे. हजारो मैल दूर असलेल्या मित्र मैत्रीणीशी चॅटिंग करणा–या मुलाला आई वडीलांच्या ... दु:खाशी देणे घेणे राहीले नाही. घरातले प्रश्न, घराची ओढ, जबाबदारी नवीन पिढीला समजेनाशी झाली आहे. ... कारण म्हणजे मोबाईलचा वाढता वापर. वाचन कमी झाल्यामुळे मनन, चिंतन, प्रश्नाची जाण राहीली ... माणसामाणसातील संवाद हरवल्यामुळे कौटुंबिक कलहाचे प्रमाण वाढले आहे. त्यातूनच अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. ही सर्व देण जागतिकीकरणाची आहे.

आज जागतिकीकरणाची भाषा म्हणून इंग्रजीचा वापर सर्वत्र सुरु आहे. त्यामुळे स्थानिक भाषेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर काळाची पावले ओळखून शासनाने पहिलीपासून इंग्रजी ... विषय अनिवार्य केला आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचा परिणाम मराठी भाषेवर ... झाला आहे. मराठी माध्यमांच्या शाळाना विद्यार्थी मिळेनासे झाले आहेत. प्रत्येक पालकाला असे वाटत आहे आपल्या ... मुलाला इंग्रजी आली पाहिजे. तो पुढे स्पर्धेत टिकला पाहिजे. त्यामुळे मुलाला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत घालण्याचे ... प्रमाण वाढले आहे. मराठी भाषिकच मराठीकडे दुर्लक्ष्य करत आहेत. मराठी बोलने हे कमीपणाचे मानल्या जावू लागले आहे. त्यामुळे भरमसाठ इंग्रजी शब्दाचा भरणा करून मराठी भाषिक लोक संवाद साधत आहेत. इंग्रजी शब्द जास्तीत जास्त वापरणे किंवा इंग्रजीतून बोलने हे प्रतिष्ठेचे लक्षण मानल्या जावू लागले आहे. त्यामुळे हिंदी, इंग्रजी मिश्रित मराठी भाषा आज व्यवहारामध्ये पाहायला मिळते. हा जागतिकीकरणाचा परिणाम आहे.

अगदी प्राचीन काळापासून मराठी भाषेवर अनेक परकीय भाषांची आक्रमणे झाली पण ती आक्रमणे परतवून लावून काळानुरूप बदल पचवून मराठी भाषा अधिकाधिक समृद्ध झालेली दिसते. पण आजच्या काळात मराठी माणूसच आपल्या भाषेकडे दुर्लक्ष्य करत आहे. त्यामुळे या जागतिकीकरणाच्या युगात, इंग्रजीच्या आक्रमणापुढे मराठी भाषा टिकते की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. भाषा टिकवायची व ती अधिकाधिक समृद्ध करण्याचे काम ती भाषा बोलणा–या लोकावर असते. त्या भाषेतून लिखान करणा–या साहित्यिकावर असते. इंग्रजी शिकने ही काळाची गरज असली तरी आपली भाषा म्हणजे आपली अस्मिता, आपली संस्कृती असते. त्यामुळे ती टिकवने आपल्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे, ही जाणीव प्रत्येक मराठी माणसाला असली पाहिजे. प्रसार माध्यमांच्या भाषेचाही प्रभाव लोकांवर पडत असतो त्यामुळे भाषा जतन व संवर्धन करण्याचं काम मराठी प्रसार माध्यमांनी केले पाहिजे. सध्या मराठी भाषेत मोठया प्रमाणात इंग्रजी शब्दाची भेसळ पाहायला मिळते जिथे इंग्रजी शब्दाला मराठी मध्ये पर्यायच नाही तिथे इंग्रजी शब्द वापरला तर हरकत नाही मात्र मराठी शब्द असतानाही केवळ खोट्या प्रतिष्ठेपाई इंग्रजी भाषेतील शब्द वापरल्यामुळे आपण आपलीच भाषा संपवत आहोत याचे ज्ञान सर्वसामान्य लोकांना झाले पाहिजे. समाजाचं प्रतिबिंब साहित्यात उमटत असतं साहित्यातूनही मोठया प्रमाणावर इंग्रजी शब्द आलेले दिसतात. प्लीज, थॅंक्यू, सॉरी, नो, एक्सक्यूज मी इ. शब्द प्रत्येकाच्या अंगवळणी पडले आहेत. उच्च शिक्षण घेवून परदेशात स्थायिक झालेल्या मुलांमध्ये आपल्या आपल्या देशाविषयी, संस्कृतीविषयी, भाषेविषयी फारशी आस्ता दिसत नाही. मराठी माणसाने मराठी भाषेविषयी अभिमान बाळगला पाहिजे.

भाषेची श्रीमंती ही त्या त्या भाषेतील बोलीवर अवलंबून असते. भाषा टिकवायची असेल तर बोली टिकल्या पाहिजेत. बोली टिकवण्याचे काम हा तळागाळातील माणूस करीत असतो. त्यामुळे हा माणूसही टिकला पाहिजे. गणेश देवी यांच्या मते, "मानवी जाणिवापासून भाषेला वेगळं काढता येत नाही. त्यामुळे जो समाज जी भाषा वापरतो, त्याच्यापासून त्या भाषेला वेगळं काढता येत नाही, त्यामुळे तार्किकदृष्टया विशिष्ट भाषेचं जतन करणे म्हणजे ती भाषा बोलणा–या भाषेचं जतन करणे होय."[3] म्हणजे वेगवेगळया जमाती जर आपले अस्तित्व टिकवून असतील तर त्यांच्या भाषाही टिकून राहतील, पण जागतिकीकरणाच्या रेटयामध्ये विकासाच्या नावाखाली अनेक जमातींना मुख्य प्रवाहात

Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli

आणताना त्यांच्या भाषा मात्र नामशेष होत आहेत. सुधीर देवरे म्हणतात,"आज मराठी भाषा जीवंत ठेवायची असेल तर मराठीतल्या बोली भाषांना आपण खूप जीव लावला पाहिजे अन्यथा, प्रमाण मराठी भाषेची अवस्था आजच्या संस्कष्त मृत भाषेसारखी व्हायला अजून काही वर्षे पुरेषी ठरतील. बोलीभाषेचे संवर्धन हेच प्रमाणभाषेचे समष्द्धत्व अधोरेखित करीत असते. प्रमाणभाषेला शुद्धत्वाच्या नावाखाली चौकटीत बंदिस्त केले तर भाषेत विपुल समष्द्ध वाङ्मय असूनही ती व्यवहारात कुचकामी ठरते."[4]

जगतिकीकरणाच्या या काळात मराठी टिकवून ठेवायची असेल, अधिकाधिक संपन्न, समष्द्ध करायची असेल तर मराठी भाषिकांनी आपल्या भाषेविषयी अभिमान बाळगला पाहिजे. जास्तीत जास्त ती व्यवहार भाषा कशी होते ते पाहिले पाहिजे. अनेक शिक्षण तज्ञाच्या मते मुलाच्या सर्वांगीन विकासासाठी मुलाचे प्राथमिक शिक्षण हे त्याच्या मातष्भाषेतूनच झाले पाहिजे. त्यामुळे शिक्षणाचं माध्यम हे महाराष्ट्रात मराठी भाषाच असले पाहिजे. त्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न होने गरजेचे आहे. इंग्रजी भाषेला महत्व हे तिच्या आर्थिक उपयोगितेमुळे मिळाले आहे. त्यामुळे मराठी भाषा ही ज्ञान भाषा बनली पाहिजे. रोजगाराच्या संधी मराठी भाषेतून निर्माण झाल्या पाहिजेत. मराठी ही आजच्या काळात टिकून राहायची असेल तर ती ज्ञान विज्ञानाची भाषा बनली पाहीजे.

**संदर्भ :-**


1) खोले विलास –सांस्कृतिक महाराष्ट्र, संपा. मधु मंगेश कर्णिक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. 295

2) प्रा. डॉ. प्रमोद मुनघाटे – लोकराज्य फेब्रुवारी 2014 पष्.38

3) डॉ. देवी गणेश –भाषा आणि बोली, लोकराज्य, फेब्रवारी 2014 पष्. 34

4) देवरे सुधीर –अनाघ्रात, अहिराणीः भाषा, कविता आणि उत्पत्ती, जानेवारी ते जून 2006 औरंगाबाद. पष्.108



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)